**चिन्मय कृष्ण दास यांच्या अटकेबाबत आमचे निवेदन**

26 नोव्हेंबर 2024

बांगलादेश संमिलित सनातन जागरण जोतचे प्रवक्ता श्री चिन्मय कृष्ण दास यांना अटक केल्याबद्दल आणि जामीन नाकारल्याबद्दल आम्ही तीव्र चिंता व्यक्त करतो. या घटनेनंतर हिंदू आणि इतर अल्पसंख्याकांवर कट्टरवाद्यांकडून असंख्य हल्ले करण्यात आले. येथे अल्पसंख्याकांच्या घरांमध्ये आणि व्यापारी संस्थांमध्ये जाळपोळ केली गेली आणि ती लुटली गेली, चोरीसह तोडफोडीचे प्रकार घडले आणि देवी-देवतांच्या मंदिरे आणि मूर्त्यांचीही मोडतोड करण्यात आली.

या घटनेतील गुन्हेगार अजूनही मोकाट फिरत आहेत, तर लोकांच्या न्याय्य मागण्या शांततेने मांडणाऱ्या एका धार्मिक नेत्यावर गुन्हे दाखल केले गेले आहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे. श्री दास यांच्या अटकेच्या विरोधात शांततेने आंदोलन करणाऱ्या अल्पसंख्यांकांवर झालेल्या हल्ल्यांबद्दल देखील आम्ही आमची तीव्र चिंता व्यक्त करतो.

हिंदूंसह इतर सर्व अल्पसंख्याकांच्या शांततापूर्ण संमेलनाच्या आणि अभिव्यक्तीच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी आम्ही बांगलादेशच्या अधिकाऱ्यांना विनंती करतो.

**नवी दिल्ली**
**26 नोव्हेंबर 2024**